# करदात्यांस सूचना

करदेयकात दर्शविलेल्या एक, अनेक अथवा सर्व कराविरूद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील कलम 217 अन्वये अपिल करण्यासाठी, देयक बजाविल्यापासून एकवीस दिवसांची मुदत आहे.

देय दिनांकापर्यंत थकबाकीसह चालू देयकाचे अधिदान न केल्यास महानगरपालिका अधिनियम कलम 202 आणि शासन अध्यादेशान्वये दरमहा २% शास्ती आकारण्यात येईल. संबंधित करांच्या पूर्ण रकमेचा भरणा होईपर्यंत उपरोक्त शास्ती देय असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील कलम 152अ अन्वये, अवैध बांधकामांवर मालमत्ता कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही.

करदात्यांस अधिकाधिक तत्पर सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने, करदात्यांस आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली माहिती महापालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावरील Property Tax (New) ह्या पर्यायाची निवड करून देयकावरील 15 अंकी लेखा क्रमांक नोंदविल्यानंतर KYC Form मध्ये आवश्यक तपशील भरून अद्ययावत करावी. तसेच, पत्रव्यवहाराच्या पत्त्यातील बदल कृपया तात्काळ Change in Billing Name & Address या पर्यायाची निवड करून अद्ययावत करावा.

अधिदान महानगरपालिकेने विहित केलेल्या निवडक 10 दिवसांव्यतिरिक्त रोज सकाळी 8.00 ते रात्री 8.00 या वेळेत विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रावर स्वीकारले जाईल. मुंबईबाहेरील धनादेशांमध्ये महापालिकेने मंजूर केलेल्या दराने (त्यावरील सेवाकरासह) सेवाशुल्क अंतर्भूत करावे. देयकावर दाखवलेल्या थकबाकीत आदेशिका शुल्क (प्रोसेस फी) किंवा दंड (जर असेल तर) यांचा अंतर्भाव केलेला नाही. देयकाचे अधिदान महापालिकेच्या कुठल्याही केंद्रावर अथवा, ई-पेमेंटच्या माध्यमातून स्वीकारले जाईल. ह्या संबंधीची अधिक माहिती, महापालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## करांच्या दराचा तक्ता

सन 2021-2022 या वर्षासाठी लागू केलेले करांचे दर

| कराचे नाव | करांची वर्गवारी | | |
|---|---|---|---|
| | तक्ता क्र.1 मधील वापरकर्ता प्रवर्ग | तक्ता क्र.2 मधील वापरकर्ता प्रवर्ग | तक्ता क्र.3 मधील वापरकर्ता प्रवर्ग |
| सर्वसाधारण कर(अग्निशमन करासहीत) | 0.110 | 0.270 | 0.500 |
| जल कर | 0.253 | 0.620 | 1.148 |
| जल लाभ कर | 0.069 | 0.170 | 0.315 |
| मलनिःसारण कर | 0.163 | 0.400 | 0.740 |
| मलनिःसारण लाभ कर | 0.043 | 0.105 | 0.195 |
| महापालिका शिक्षण उपकर | 0.040 | 0.100 | 0.190 |
| राज्य शिक्षण उपकर | 0.035 | 0.080 | 0.146 |
| रोजगार हमी उपकर | 0.000 | 0.020 | 0.042 |
| वृक्ष उपकर | 0.002 | 0.005 | 0.010 |
| पथ कर | 0.050 | 0.130 | 0.230 |

तक्ता क्र.1 ते 3 संबंधीची माहिती महापालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मालमत्तेशी संबंधित युजर कॅटेगरी बाबतचा तक्ता :-

| Sr.No. | Legend | Specification |
|---|---|---|
| 1 | r | Residential units up to 46.45 m2 (500.00 Sq.ft.) |
| 2 | R | Residential units above 46.45 m2 (500.00 Sq.ft.) |
| 3 | nR | Residential unit not intended to be used for Residential Purpose. E.g.Porch, Refuge area etc. |
| 4 | C | Commercial |
| 5 | L | Land |
| 6 | I | Industrial |

बृहन्मुंबई महानगरपालिका आपातकालीन व्यवस्थापन कक्ष व मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभाग संपर्क क्र. 1916,22694727
कोविड19 सार्थीदरम्यान वेघर व गरजू व्यक्तींच्या मदतीसाठी दुरध्वनी सेवा क्र. 1800 22 1292
लहान व गरजू मुलांच्या मदतीसाठी 24 तास तात्काळ सेवा दुरध्वनी क्र.1098

Though Hon.HC in W.P.No.2592/2013 has struck down 20,21 & 22 of the CV Rules, the present bill has been raised on protective basis.

**१८ वर्षे पूर्ण झालेल्या सगळ्यांनी मतदार यादीत नांव नोंदणी करा !**
**'मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम - दि. ०१ ते ३० नोव्हेंबर २०२१'**